ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 5 | JANUARY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# वामन होवाळ : व्यक्तित्व आणि साहित्य

**डॉ.शिवाजीराव देशमुख**
मराठी विभाग, तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर , जि.उस्मानाबाद

**प्रास्ताविक :**



स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्वाचा आणि वैशिष्टयपूर्ण साहित्य प्रवाह म्हणजे दलित साहित्याचा प्रवाह होय. महात्मा फुले ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर या समाजप्रबोधकांच्या परंपरानी आत्मभान जागे झालेल्ड्या तरुणांना आपल्या सामाजिक व राजकीय हक्काची जाणीव झाली. शिक्षणाचा वाढता प्रसार, वैज्ञानिक प्रगती, यांत्रिकीकरण, खेडयांचा झपाटयाने होणारा विकास या प्रक्रियेत स्वत्वाचा शोध घेणारी बहुजन समाजातील तरुण पिढी आपल्या जातीवर्गाच्या हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी आक्रम झाली. आपल्या समाजाच्या दैण्यावस्थेचा, दारिद्रयाचा, अज्ञानाचा, वेदनेचा अनुभव जाणतेपणी घेणारी ही पिढी लिहिती झाली आणि मराठी साहित्याचा कायापलट होण्यास आरंभ झाला.

दलित कवितेच्या स्वरुपात उजाडलेली ही निळी पहाट आज वर्तमान स्थितीत कविता, कादंबरी, आत्मकथा, नाटक, कथा अशा वेगवेगळया साहित्य प्रकाराद्वारे तेजोमय सूर्य होऊन तळपत आहे. दलित साहित्याच्या प्रवाहातील एक महत्वाचा मूलगामी साहित्य प्रकार म्हणून दलित कथा सर्व परिचित झाली आहे. दलित कथेत मोलाची आणि भरीव कामगिरी करणारे, प्रारंभीचे प्रमुख कथाकार म्हणून आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल यांचे नाव प्राधान्याने घेतले जाते. ही दलित कथेची परंपरा चालविणारे अनेकविध कथाकार पुढे साहित्याच्या प्रवाहात होऊन गेले. या प्रवाहातील एक प्रमुख आणि वर्तमान स्थितीतही अविरतपणे दलित कथेची सेवा करणारे एक महत्वाचे कथाकार म्हणजे वामन होवाळ हे होय.

वामन होवाळ यांच्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण कथा लेखनाने मराठी कथेला एक नवे आयाम निर्माण करुन दिले आहे. ‘‘वामन होवाळ : व्यक्तित्व आणि साहित्य’’ या संशोधन विषयाचे विस्तृत विवेचन खालीलप्रमाणे करता येईल.

**वामन होवाळ : एक प्रतिभासंपन्न व्यक्तित्व**

१ एप्रिल १९३८ रोजी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत वामन होवाळ यांचा जन्म झाला. दलित समाजात जन्माला आलेल्या या लेखकांनी आपला समाज, आपला गाव, सभोवतालचा परिसर, सभोवतालची माणसे यांना लहानपणापासून आत्मसात केले होते. ग्रामीण समाजात दलित म्हणून गणल्या गेलेल्या लोकांच्या जगण्याला अत्यंत जवळून अनुभवल्याने या जगण्याच्या मूल्यात्मक संस्कारातून वामन होवाळाच्या व्यक्तित्वाची जडण-घडण झालेली आहे. ग्रामीण जीवनाच्या संस्कारातून परिपक्वता निर्माण झालेले होवाळ या माणसाच्या जगण्याला शब्दबध्द करु लागले आणि त्यांच्या लेखनीतून दर्जेदार, गुणात्मक कथांची निर्मिती होऊ लागली. मार्च १९६३ मध्ये होवाळांची पहिली कथा प्रसिध्द झाली तर पुढे १९७३ मध्ये ‘बेनवाड’ हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रसिध्द झाला. दलित जीवनाच्या जाणीवा अभिव्यक्त करण्याबरोबर ग्रामीण माणसाच्या जगण्याला, तिथल्या वातावरणाला परिणामकारकतेने साकारणाऱ्या वामन होवाळांच्या या कथा अस्सल जीवनाचे चित्रण करतात. वामन होवाळांच्या खास अशा वेगळया शैलीतून विनोदाच्या साह्याने साकारलेल्या या कथा निश्चितच समकालीनात वेगळया आणि स्वतंत्रेची जाणीव करुन देणाऱ्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात एकूणच मानवी समाजात आमुलाग्र बदल घडून आला. शिक्षणाचे सार्वत्रिकरण, उद्योगधंद्याचा विकास, यांत्रिकी संस्कृती अशा वेगवेगळया स्वरुपात माणसाच्या जगण्यात विविधता निर्माण झाली. या बदलत्या जीवन संस्कृतीच्या मुशीतून घडलेले वामन होवाळ यांचे लेखन त्यांच्या व्यक्तिमत्वाची वेगळी जाणीव करुन देते. समकालीनात आपले वेगळेपण सिध्द करणारी

वामन होवाळांची कथा प्रथगात्म पध्दतीची, खुमासदार संवादाची, खटकेबाज संघर्षाची, मिश्कील शैलीतली, दलित वेदनेला स्पर्श करणारी अशा वेगवेगळया वैशिष्टयांनी परिपूर्ण अशीच आहे.

## वामन होवाळ : एक प्रतिथयश कथालेखक

दलित जीवन जाणीवांना शब्दांकित करणारी दलित कथा आज वर्तमान स्थितीत विकसित व विस्तारीत स्वरुपात पहावयास मिळते. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल यांच्या पासून ते योगीराज वाघमारे, शरणकुमार लिंबाळे यांच्या पर्यंत दलित कथेची एक मोठी पिढी दलित कथा लिहित आली आहे आणि लिहितही आहे. या दलित कथेत मोलाची आणि महत्वपूर्ण भर घालणारे एक प्रतिथयश कथालेखक म्हणजे वामन होवाळ होय. वामन होवाळ यांची कथा मी बरोबर आम्हीचेही वास्तव चित्रण रेखाटते. म्हणूनच कथेच्या कथानक, वातावरण, व्यक्तिचित्रण, प्रसंगनिर्मिती, भाषाशैली, निवेदनशैली या सर्वच घटकांत ती समकालीनात निश्चितच वेगळी ठरते. वामन होवाळ यांनी दलितांच्याच जगण्याला आपल्या लेखनीद्वारे अभिव्यक्त केले असे नाही तर एकूणच ग्रामीण माणसाच्या जगण्यालाही त्यांनी शब्दबध्द केले आहे. आपली कथालेखनाविषयीची भूमिका एस.एस.डी.टी. विद्यापीठात झालेल्या एका परिसंवादात त्यांनी मांडली आहे. ते म्हणतात, "माझ्या कथाविश्वात प्रसंगोपात, हरिजन, अस्पृश्य, नवबौध्द, डॉ.आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गाने जाणारी अशी माणसं आणि त्यांचे जीवनचित्रण अवश्य आहे, परंतू लेखक म्हणून त्यांच्या विषयी लिहिले नाही. दलित आणि दलितेत्तर असा भेद मी केला नाही. अन्याय करणाऱ्या व्यक्ति आणि अन्याय करणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक प्रवृत्ती यावर मी बोट ठेवले आणि अन्याय वृत्ती-प्रवृत्तींना बळी जाणाऱ्या सामान्य माणसाकडे माझी दृष्टी वळली."[१] आपल्या कथालेखनाची भूमिका स्पष्ट करताना वामन होवाळ यांनी दलित दलितेत्तर अशा भेदात न अडकता माणूस आणि त्याच्या जगण्याला केंद्र करुन वेगवेगळया वृत्ती प्रवृत्तीवर कसे बोट ठेवले आहे ते नेमकेपणाने सांगितले आहे.

वामन होवाळ यांनी माणसाच्या जगण्यातील धगधगत्या वास्तवाला विनोदीशैलीच्या स्वरुपात आपल्या कथालेखनात साकारले आहे. वामन होवाळ यांनी माणसाच्या जगण्याची कोंडी साकारत माणसाच्या जगण्यातील कारुण्य आणि समाज व्यवस्थेविरुध्द केलेला विद्रोह आपल्या बेनवाड (१९७३), येळकोट (१९८२), वारसदार (१९८६), वाटा-आडवाटा(१९८८) आणि ऑडिट (२००३) या कथासंग्रहातून प्रतिबिंबित केला आहे. वामन होवाळ यांची कथा वैशिष्टयपूर्ण आणि लक्षवेधी कशी आहे याविषयी नेमकेपणाने भाष्य करताना केशव मेश्राम म्हणतात, "दलित-पिडीत आणि शोषित समाजातील माणसे अंधश्रध्दा आणि अज्ञानामुळे शोषण व्यवस्थेच्या चरकात कशी पिळवटून काढली जातात त्याचे विदारक दर्शन वरवर विनोदी वाटणाऱ्या ; पण कारुण्याने थबथबलेल्या ढंगदार शैलीत घडविणे हा श्री.वामन होवाळ यांचा अनोखा विशेष म्हणून नोंदवावा लागेल. दलित कथेत होवाळांची कथा पूर्ण त्यांची स्वतःची, स्वतंत्र आणि वेगळी आहे. कारण ती अनुकरणीय अशीच आहे. त्यातील दलित जाणीव व विनोद लक्षवेधी आहे."[२] केशव मेश्राम यांनी वामन होवाळ यांची कथा ढंगदार शैलीतून माणसाच्या वास्तव जगण्याची कारुण्यपूर्व गाथा कशी साकारते ते अतिशय प्रत्ययकारितेने टिपले आहे.

मानवी दुःखाचं मुळ, त्या दुःखाचं अस्तित्व टिपणारी वामन होवाळ यांची कथा वर्गविहीण आणि जातीविहीण असल्यामुळे कथेच्या परिणामांच्या पलिकडे जाणारी ही कथा ठरली आहे. सांगली आणि कराड परिसरातल्या वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्तींच्या मानवी स्वभावांचा कोवळेपणा आणि झणझणीत फणका वामन होवाळ यांच्या कथासंग्रहातून साकारलेल्या वेगवेगळया पात्रांमध्ये सहजपणाने आल्याची जाणीव होते. दलित समाजाची जाणीव संयत स्वरुपात शब्दांकित करणाऱ्या होवाळांच्या कथा माणसाच्या जगण्याचे मुलगामी विचारमंथन करणाऱ्या आहेत. दलित कथेच्या पारंपारिकतेची जाणीव ठेवून या कथाविश्वाला आपल्या ढंगदार शैलीने नवे आयाम निर्माण करुन देणारी वामन होवाळांची कथा स्वतंत्रेची जाणीव करुन देते.

## बेनवाड :

वामन होवाळांनी ग्रामीण माण्साच्या जगण्याला केंद्रस्थानी ठेवून 'बेनवाड' या कथासंग्राहातील कथा विनोद, उपरोध व उपहास या वैशिष्टयांनी साकार होते. दलित कथेच्या प्रवाहाला या प्रकाराच्या कथांनी एक वेगळे वळण निर्माण करुन, वामन होवाळ यांनी दलित कथेचा विकास आणि विस्तार साधला हे मान्य करावे लागते. या कथासंग्रहातील 'वसुली', 'कुरघोडी', 'साखरेचं खाणारं', 'हिसका', 'देव धावला देव पावला', 'पायताणाचा उतारा', 'आतली टांग', 'बेनवाड' या व अशा इतर अनेक था खेडयातील अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, प्रेम प्रकरणे, गावातील भानगडी, कृषी जीवन अशा वेगवेगळया ग्रामीण समाजातील विषयांना प्रतिबिंबित करतात. समाजातील वेगवेगळया घटकांना केंद्रस्थानी ठेवून वामन होवाळ वास्तव जीवनाला कसे साकार करतात ते 'बेनवाड' च्या प्रस्तावनेत सांगताना मधू कोदे म्हणतात, "प्रस्थापितांच्या वागण्या-बोलण्यातील विसंगती हुडकून काढून त्याची हास्यस्पदता आपल्या उपाहासमगर्भ लेखनाने वाचकांच्या ते नजरेस आणतात. त्यांचा हास्यविषय झालेल्या व्यक्ति केवळ उच्चवर्णीय आहेत असे नाही तर आपल्या

स्वतःच्या समाजातील व्यक्तींचा भोंदूपणाही त्याच मोकळेपणाने वाचकांपुढे ठेवायला ते कचरत नाहीत.''[३] मधू कोदे यांनी वामन होवाळांनी उपहासगर्भ लेखनीने समाजातील विदारक वास्तवावर बोट ठेवून प्रस्थापितांच्या ढोंगी जगण्याला मोकळेपणाने कसे रेखाटले ते नेमकेपणाने सांगितले आहे.

**येळकोट :**

दलित ग्रामीण कथालेखक म्हणून वामन होवाळांची ओळख निर्माण करुन देणारा एक महत्वपूर्ण कथासंग्रह म्हणजे 'येळकोट' हा होय. या कथासंग्रहातून होवाळांनी उपरोध आणि उपहासात्मकेतेने समाजातील धार्मिक रुढी, परंपरा, अंधश्रध्दाळूपणा, ढोंगी वृत्ती आणि दृष्ट प्रवृत्ती यांचा परिणामकारकतेने वेध घेतला आहे. प्रस्तुत कथासंग्रहातून चित्रित झालेल्या कथा परंपरा आणि अज्ञानाच्या बंधनात बंदिस्त झालेल्या मानव समुहाचे प्रबोधन करताना दिसून येते. महाराष्ट्रात समाज प्रबोधनाला लोकहितवादी, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, म.वि.रा.शिंदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशी मोठी परंपरा आहे. या परंपरेतील विचाराची जाणीव करुन देणाऱ्या अनेकविध कथा वामन होवाळ यांच्या व्यक्तित्वातील समाजप्रबोधकाचे विलोभनीय दर्शन घडवितात. या कथासंग्रहातील 'धुराळा' या कथेतून ग्रामीण समाजात शिक्षण प्रसारासाठी कशी धडपड केली जाते ते पहावयास मिळते. तसेच ग्रामीण समाजातील विद्यार्थी योग्य मार्गाने जावे यासाठी प्रयत्न करणारी शिक्षिका चित्रित करुन वामन होवाळांनी समाजसुधारणेचा विचार प्रस्तुत केला आहे. वर्गातील काही मुलं तंबाखू खातात हे समजल्यानंतर त्या म्हणतात, ''हे पहा मी तंबाखू खातो असे कुणी सांगेल, त्याला मी मारणार नाही. काही बोलणार सुध्दा नाही.'' बाईच्या व्याकुळतेतून समाजसुधारणावादी विचारधारा प्रत्ययाने अनुभवास येते. या कथासंग्रहात एकूण १९ कथा आहेत. या प्रत्येक कथातून माणसाच्या जगण्याची धडपड चित्रित केली असून प्रसंगी वेगवेगळया स्वार्थ प्रवृत्तीची माणसंही या कथांना उभारी देतात.

**वारसदार :**

वामन होवाळ यांच्या वारसदार या कथासंग्रहातील कथा भारतीय समाजव्यवस्थेतील जातीयतेचा समोपचाराने वेध घेते. या कथासंग्रहातील वेगवेगळया कथातून वामन होवाळ जातीय दांभिकतेवर उपहासात्मकतेने भाष्य करतात. समाजातील जातीयतेतील दरी नष्ट व्हावी म्हणून 'वारसदार' या कथेतील आंतरजातीय विवाहाच्या अनुषंगाने उभे केलेले घटना-प्रसंग होवाळांच्या आत्मिक अनुभूतीचे आणि सामाजिक जिव्हाळयाचे दर्शन घडविणारे आहेत. या कथेतील नायक आधुनिक विचारसरणी अनुसरुन जीवन जगणारा आहे. जातीपातीची असलेली बंधने तोडून तो एका ब्राह्मण मुलीशी विवार करतो. परंतू पुढे त्याला अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. एका ठिकाणी आलेला प्रसंग अतिशय बोलका आहे. पंचायत समिती सदस्य असणाऱ्या आपल्या भावाला हिंदू महार अशी नोंद करुन देण्याबद्दल विचारणा केल्यास तो त्याचा तिरस्कार करतो आणि म्हणतो, ''तुझी अक्कल बंद कर सदा ! तू ह्याच कामासाठी आला असशील तर आत्तांच्या आत्ता चालता हो ! मला त्वांड पण दाखवू नको !''[४] ग्रामीण दलित समाज शिक्षणाने शहाणा झाला असला तरी आपण याचा स्वीकार केला तर आपल्याला मिळणाऱ्या सोयी सुविधा बंद होतील या विचाराने माघार कसे घेतात तेही वामन होवाळ प्रत्ययकारितेने टिपतात.

वारसदार कथासंग्रहातील कथातून वाचनीयता, श्रवणीयता आणि आटोपशीरपणा ही त्यांच्या कथांची वैशिष्टय या कथासंग्रहातही पहावयास मिळतात. तसेच या कथासंग्रहाचे वेगळे एक वैशिष्टय सांगता येते असे की, व्यक्तिबरोबर समूह जीवनाशी निगडीत आशय त्यांच्या या कथा संग्रहातून प्रतिबिंबित होतो. प्रगतशील आणि सुधारणावादी विचारसरणीच्या वामन होवाळांच्या व्यक्तित्वाचे दर्शन प्रस्तुत कथासंग्रहात नेमकेपणाने घडते.

**वामन होवाळ यांच्या कथांमधील भाषिक सौंदर्य :**

वामन होवाळ यांच्या कथांमधील भाषिक सौंदर्याचा विचार करता या कथातून साकारणारी भाषाशैली, त्या त्या प्रदेशाला, तिथल्या वातावरणाला, व्यक्ति वृत्ती-प्रवृत्तीला, भाव-भावनांना जीवंत आणि तजेलदारपणाने साकार करते. या कथासंग्रहातून अभिव्यक्त होणारी भाषा ही सामान्यतः ग्रामीण परिसरामधील आहे. या भाषेला वामन होवाळांच्या विनोदी शैलीने परिणाकारकता प्राप्त झाल्यामुळे ती भाषा त्या त्या कथांच्या गुणात्मक सौंदर्यात महत्वाची भर घालते. प्रमाणभाषा आणि बोली भाषेच्या संयुक्तिक वापरामुळे वामन होवाळ यांच्या कथांना परिणामकारकता लाभल्याचे जाणवते. वामन होवाळांच्या कथांतील सौंदर्यात्मकतेवर नेमकेपणाने भाष्य करताना सदा कऱ्हाडे म्हणतात, ''मनोरंजक निवेदन, हलकीफुलकी आणि सहज शैली, कमालीची लवचिक व सफाईदार भाषा, वर्णनासाठी योजिलेल्या उपमा-उत्प्रेक्षा निःसंशय ताज्या, नव्या, अर्थवाही आणि प्रत्ययकारी असतात.''[५] सदा कऱ्हाडे यांनी वामन होवाळ यांच्या कथातून साकारणारी भाषा कशी वेगवेगळया अंगांनी सिध्द होते ते स्पष्ट केले आहे.

वामन होवाळ सभोवतालच्या जीवनामधील विसंगतीला अधोरेखित करताना उपरोधात्क, उपहासात्मक व विनोदी भाषेचा वापर प्रत्यकारितेने करतात. आपल्या कथेतील घटना-प्रसंगांना अधोरेखित करण्यासाठी वामन होवाळ यांनी सांगली आणि परिसरातील प्रादेशिक

बोली भाषेचा समर्थपणे वापर केला आहे. लोकजीवनामधील वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, उपमा यांचा भाषेत योग्य वापर करुन वामन होवाळांनी ग्रामीण जीवनातील वास्तवाला अधोरेखित केले आहे. तसेच अनेक इंग्रजी शब्दांचाही वापर वामन होवाळ करतात. एकूणच वामन होवाळांच्या कथेचे एक प्रमुख वैशिष्टय बनून त्यांची भाषा सामोरे येते.

अशा प्रकारे सरतेशेवटी सारांश रुपाने सांगता येते की, वामन होवाळ यांच्या प्रतिभासंपन्न व्यक्तित्वाने दलित कथा साहित्याला एका वेगळया विश्वाची ओळख करुन दिली. वामन होवाळ हे जन्माने दलित आहेत आणि विचाराने आंबेडकरवादी आहेत पण ते प्रथमतः मराठीतील कथालेखक आहेत आणि नंतर ते दलित लेखक आहेत. ते त्यांच्या लेखन प्रपंचावरुन प्रत्ययास येते. माणसाला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली होवाळाची कथा निखळ भावस्पर्शी आणि विचार प्रवृत्त करणारी आहे. मनोरंजकतेच्या मुशीतून अर्थबोधन करणाऱ्या वामन होवाळांच्या कथा ग्रामीण दलित कथेच्या अनुभव कथा विसतारणाऱ्या अशाच आहेत.

## संदर्भसूची

१) होवाळ वामन, माझे समकालीन कथाकार, कथा-शताब्दी (परिसंवाद), पृ.४२.
२) मेश्राम केशव, सातिय प्रवर्तन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ.१५ जुलै २००५, पृ.१५३.
३) कोदे मधू, बेनवाड, प्रस्तावना, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, चौथी आवृत्ती, २०१२.
४) होवाळ वामन, वारसदार, स्वयंदिप प्रकाशन, मुंबई, पृ.११२.
५) होवाळ वामन, येळकोट, स्चयंदिप प्रकाशन, मुंबई, पृ.११७.
६) सदा कऱ्हाडे : वारसदार वामन होवाळांची कथा : बेनवाड ते वारसदार, वामन होवाळ, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, चौथी आवृत्ती २०१२.